# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## मा. फ प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ०३

## सभावृत्तांत

दिनांक :– ०४/०७/२०१९ वेळ :- स.११.३०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०४/०७/२०१९ रोजी स. ११.३० वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सभापती |
| २. | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्य |
| ३. | मा.साधना अंकुश मळेकर | सदस्य |
| ४. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| ५. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| ६. | मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ७. | मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्य |
| ८. | मा.पंकज दत्तात्रय भालेकर | सदस्य |
| ९. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| १०. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| ११. | मा. संतोष भाऊसाहेब मोरे | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.मनोज लोणकर-क्षेत्रिय अधिकारी. मा. प्रभावती गाडेकर - प्रशासन अधिकारी, मा. प्रदिप पुजारी - कार्यकारी अभियंता (झोनिपु स्थापत्य), मा. मोहन निकम (लेखाधिकारी), मा. सतिश वाघमारे- उपअभियंता (स्था), मा. हनुमंत शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), मा. अशोक अडसुळे - उपअभियंता (वि.), मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (स्था.), श्री किशोर महाजन-उपअभियंता (ज.नि.),मा. सुनिल शिंदे-उपअभियंता नगररचना, मा. डॉ अरुण मारुती दगडे-पशुवैद्यकिय अधिकारी, श्री गिरीश सलगरकर-मुख्य लिपिक, श्री सुभाष पवार -क्रिडा पर्यवेक्षक, श्री डी . जी. कांबळे – उद्यान सहाय्यक.

सभापती मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०२ गुरुवार दिनांक १३/६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कामय करणेत येत आहे असे मा. सभापती यांनी प्रकट केले. केले.

---

Scanned by CamScanner

विषय क्र - १ ठराव क्र. - ५

दिनांक - ०४/०७/२०१९ विभाग – प्रशासन

सुचक- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक- मा.संजय नेवाळे

संदर्भ – १.मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र.
क्रमांक- फक्षेका/२/कावि/३६०/२०१८ दिनांक - ०३/११/२०१८.
२.मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्र.२ दि.१३/०६/२०१९

फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हॉकर्स झोनचे निश्चित केलेल्या ठिकाणास नेमणेत आलेल्या उपसमिती मार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे हॉकर्स ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. सदर ठिकाणांना मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेत येऊन सदरचा विषय शहर फेरीवाला समितीकडे अंतिम मान्यते कामी सादर करावयाचा असल्याने मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे सर्व संबंधित अधिकारी यांनी प्रभाग समिती सदस्यांसमवेत दिनांक १९/०६/२०१९ रोजी प्र.क्र.१२ , १३ व दिनांक २१/०६/२०१९ रोजी प्र.क्र.१ ,११ ची पाहणी करणेत आली. हॉकर्स ठिकाणे पाहणीनंतर सन्मा.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे हॉकर्स यादीमध्ये शेरांकन करुन सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे हॉकर्स ठिकाणे निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर हॉकर्सची ठिकाणे शहर फेरिवाला समितीकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणे येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

-------------

विषय क्र - २ ठराव क्र. - ६

दिनांक -०४/०७/२०१९ विभाग – सदस्य प्रस्ताव

सुचक- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक- मा.संजय नेवाळे

संदर्भ – १.मा. योगिता नागरगोजे, सदस्य यांचा दिनांक ०४/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव
२ मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्र. 19 दि. 04/12/2018
३ . मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्र. 03 दि. 13/06/2019

फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार)– १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर २)समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण – मोरवाडी, जयभगवान महासंघ - पिंपरी चिचंवड परिवर्तन पार्टी, पिंपळे गुरव यांनी दि. 16/01/2019 व 21/01/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंढे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही सस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबत सांगोपांग चर्चा होऊन सदरचा विषय माहे डिसेंबर २०१९ मध्ये होणा-या मासिक सभेपर्यंत तहकूब करणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सदर विषय माहे डिसेंबर २०१९ चे मासिक सभेपर्यंत सर्वानुमते तहकुब करणेत आला असे.

-------------

Scanned by CamScanner

ठराव क्र. - ७

विभाग प्रशासन

विषय क्र - ३

दिनांक - ०४/०७/२०१९

अनुमोदक- मा. साधना मळेकर

सुचक- मा.संजय नेवाळे

संदर्भ – क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/२/कावि/४५९/२०१९ दि.१/७/२०१९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पेठ क्र. २० चिखली कृष्णानगर येथील भाजीमंडई मधील एकुण १३९ गाळे वितरण करणेसाठी सदर गाळ्यांवर अतिक्रमण करुन व्यवसाय करीत असलेले विक्रेते यांचे सर्व्हेक्षण करून यादी अंतिम करावी व त्यास मा.प्रभाग समितीची मान्यता घेऊन भुमि आणि जिंदगी, मुख्य कार्यालय विभागाकडे पाठविणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी क्रमांक भुजि/कावि/ १४४/२०१९ दिनांक ०६/०६/२०१९ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

मा. आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार 'फ' क्षेत्रिय कार्यालयामार्फत दिनांक १२/०६/२०१९ सर्व्हेक्षण केले परंतू जे व्यावसायिक जागेवर अनुपस्थित होते त्यांची पाहणी दिनांक १८/०६/२०१९, २०/०६/२०१९, २८/०६/२०१९ आणि ०१/०७/२०१९ रोजी केली असता पेठ क्र. २० चिखली कृष्णानगर येथील भाजी मंडईमध्ये सोबतच्या यादीप्रमाणे गाळ्यांवर अतिक्रमण करुन व्यवसाय करीत असलेले १३८ विक्रेते आढळून आले असून गाळा क्रमांक ७४ व ७५ च्या मधील मोकळ्या जागेत श्रीमती शेरणा निलेश भोसले अनधिकृतपणे व्यवसाय करीत असलेचे आढळून आले आणि गाळा क्रमांक ९९ या गाळ्यावर कोणीही व्यवसाय करताना आढळले नाही तरी सदर १३९ विक्रेते यांची यादी अंतिम करून पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यालय भुमि आणि जिंदगी विभागाकडे पाठविणेस मान्यता देणे असा मूळ प्रस्ताव होता. सदर प्रस्तावास सन्मा.सदस्य् श्री संजय नेवाळे यांनी उपसूचना मांडली की, चिखली,पेठ क्र.२० भाजी मंडई,कृष्णानगर येथे सद्यसितीत जे भाजी विकेते व्यवसाय करीत आहेत त्यांची ओळख् पटवून त्यांनाच गाळा देणेत यावा तसेच एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदरचे गाळे देणेत यावेत अशी उपसूचना मांडली. या उपसूचनेसह मूळ प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(योगिता नागरगोजे)
सभापती
फ प्रभाग समिती निगडी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/ २० /२०१९ दिनांक १२/०७/२०१९.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव ( सभाशाखा )
फ प्रभाग समिती
निगडी,

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned by CamScanner